① लोकसत्ता पृ. भाग नं. ०१ दि. २६/१०/२२.

# दिवाळीची अधिसूचना उशिराने

लोकसत्ता प्रतिनिधी

**विरार :** सणाच्या निमित्ताने वाजविल्या जाणाऱ्या फटाक्यांमुळे पर्यावरणाची हानी होत असल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने नियमावली ठरवून दिली आहे. नागरिकांच्या माहितीसाठी पोलिसांनी ही नियमावली किमान सणाच्या दोन ते तीन दिवसअगोदर जाहीर करणे आवश्यक आहे. मात्र मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाने दिवाळीचे दोन दिवस गेल्यानंतर मंगळवारी नियमावली जाहीर केली.

सन २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी देताना न्यायालयाने वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण आणि घनकचऱ्याच्या समस्या निर्माण करणाऱ्या फटाक्यांवर बंदी आणली आहे. सणाच्या दिवशी फटाके वाजवण्यास रात्री ८ ते १० वाजेपर्यंत परवानगी देण्यात आली आहे. तर नाताळ आणि नववर्षासाठी रात्री ११.५५ पासून १.३० पर्यंत मुभा आहे. हे नियम नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी पोलिसांवर आहे. आयुक्तालयाने नागरिकांना दिवाळीचे दोन दिवस उलटल्यानंतर या सूचना दिल्या आहेत. याबाबत माहिती देताना अतिरिक्त आयुक्त विजयकांत सागर यांनी माहिती दिली की, सदरची नियमावली उशिरा नाही तर वेळेवर दिली आहे. नागरिकांनी या नियमांचे पालन करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

② लोकसत्ता पृ. भाग नं. ०१

# विरारमध्ये महिलांसाठी स्वतंत्र कोठडी

## मांडवी पोलीस ठाण्यात सुविधा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** विरारमधील मांडवी पोलीस ठाण्यामध्ये महिलांसाठी स्वतंत्र पोलीस कोठडी तयार केली जाणार आहे. आतापर्यंत केवळ वसई पोलीस ठाण्यात महिलांसाठी एकमेव पोलीस कोठडी होती. त्यामुळे महिला कैद्यांना कोठडीत ठेवण्यासाठी तसेच कोर्टात नेण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागत होती.

वसई, विरार शहरात एकूण दोन पोलीस परिमंडळ असून दहा पोलीस ठाणे आहेत. त्यामध्ये वसई, माणिकपूर, वालीव नालासोपारा, तुळींज, अर्नाळा सागरी आणि विरार या पोलीस ठाण्यांचा समावेश होता. यावर्षी मांडवी, पेल्हार आणि आचोळे या तीन नव्या पोलीस ठाण्यांची निर्मिती झाली होती. मात्र यापैकी वसई पोलीस ठाणे वगळता कुठल्याही पोलीस ठाण्यामध्ये महिला पोलिसांसाठी स्वतंत्र पोलीस कोठडी नव्हती. वसई हे सर्वात जुने पोलीस ठाणे आहे. केवळ याच पोलीस ठाण्यामध्ये महिलांसाठी स्वतंत्र पोलीस कोठडीची सुविधा आहे. त्यामुळे इतर पोलीस ठाण्यांतील महिला कैद्यांना ठेवण्यासाठी त्यांना वसई पोलीस ठाण्यामध्ये आणावे लागते. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये पोलिसांचा वेळ खर्च जातो आणि मनस्ताप सहन करावा लागत होता. त्यामुळे नव्याने तयार झालेल्या मांडवी पोलीस ठाण्यामध्ये पुरुष आणि महिला कैद्यांसाठी स्वतंत्र पोलीस कोठडी तयार केली जात आहे. या पोलीस कोठडीचा फायदा मांडवीसह विरार, पेल्हार आणि आचोळे या तीन पोलीस ठाण्यांना होणार आहे.

नव्याने तयार झालेल्या मांडवी पोलीस ठाण्यामध्ये पोलिसांची कोठडी नव्हती. आता पोलीस कोठडी तयार करण्यात येत आहे. त्यासाठी साडेसतरा लाख रुपये मंजूर करण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ही पोलीस कोठडी तयार केली जाणार आहे. पुढील महिन्याभरात ही पोलीस कोठडी तयार होईल, अशी माहिती मांडवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रफुल्ल वाघ यांनी दिली.

③ लोकसत्ता पृ. भाग नं. ०१

# वसई, भाईंदरमध्ये आगीच्या ३४ घटना

लोकसत्ता प्रतिनिधी/वार्ताहर

**विरार/भाईंदर :** वसई, विरार आणि मीरा-भाईंदरमध्ये ३४ ठिकाणी आगीच्या घटना घडल्या आहेत. त्यामध्ये वसई-विरारमधील ७ घटनांचा समावेश आहे. काही ठिकाणी फटाक्यांमुळे तर काही ठिकाणी शॉर्टसर्किटमुळे आगी लागण्याचे प्रकार घडले आहेत. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

करोनानंतर निर्बंधरहित पहिलीच दिवाळी असल्याने नागरिक मोठ्या उत्साहाने सणाचा आनंद घेत आहेत. त्यात या वर्षी मोठ्या प्रमाणात फटाक्यांची विक्री झाली आहे. शहरात मोठ्या प्रमाणात नागरिकांनी



फटाके वाजविले. यामुळे काही ठिकाणी आगी लागल्या. यात विरारमधील गोपचरपाडा परिसरात गादीच्या दुकानाला, मोहक सीटी परिसरात एका दुकानाला, नवापूर येथे नारळाच्या झाडाला, वसई फाटा येथे चपलाच्या गोदामाला आग लागली होती. गोदामाच्या आगीत दीड कोटींचे नुकसान झाले. गोदामात अग्निशमन यंत्रणा नसल्याने मालकाला पालिकेने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. नायगाव पूर्व या ठिकाणी घरात आग लागली होती, तर वसई पश्चिमेला के.टी. येथे सत्यम बंगल्याला आग लागली होती, तर इतर ठिकाणी कचऱ्याला आग लागल्याची माहिती मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी दिली आहे.

तर दुसरीकडे मीरा-भाईंदर येथे लक्ष्मीपूजनाच्या दिवशी २७ ठिकाणी आगीच्या घटना घडल्या आहेत. २३ ठिकाणी आग ही साचलेल्या कचऱ्याला लागल्यामुळे ती त्वरित विजवण्यात आली. मसाल्याच्या गोदामाला आणि न्यू गोल्डन नेस्ट फेस २ येथील एका घराला शॉकसर्किटमुळे आग लागली होती. मीरा रोड येथील अस्मिता रेसिडेन्सीमधील पहिल्या मजल्यावर रॉकेटमुळे आग लागली. या आगीत घराच्या बाल्कनीचा (खिडकीजवळील) संपूर्ण परिसर जळून गेला. भाईंदर पूर्व येथील गीतानगर परिसरात गीता पुष्प या इमारतीच्या सहाव्या मजल्यावर राहणाऱ्या कुटुंबीयांनी सायंकाळी घरात लावलेल्या दिव्याने अचानक पेट घेतला. अवघ्या काही क्षणात घरातील सर्व इलेक्ट्रिक आणि ज्वलनशील साहित्य पूर्णतः जळून गेले. सातव्या मजल्यापर्यंत आग वाढत गेली होती. आगीच्या घटनेच्या ठिकाणी अग्निशमन विभागाने धाव घेतल्यामुळे कोणत्याही स्वरूपाची जीवितहानी झाली नसल्याची माहिती पालिकेचे अग्निशमन अधिकारी प्रकाश बोराडे यांनी दिली.

दि. २५।११।२२

(७) लोकसत्ता पु. ५१५ न०७१

**अंतरंग**

## तुंगारेश्वर येथील आश्रमाला ६९ गुंठे जागा

वसई : वसई पूर्वेच्या तुंगारेश्वर डोंगरावर असलेल्या बालयोगी श्री सदानंद महाराज यांच्या आश्रमास ६९ गुंठे जागा मिळणार आहे. सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी केलेल्या मागणीवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे.

५१२न.०४.

# तुंगारेश्वर येथील बालयोगींच्या आश्रमाला ६९ गुंठे जागा

### मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

**लोकसत्ता वार्ताहर**

वसई : वसई पूर्वेच्या तुंगारेश्वर डोंगरावर असलेल्या बालयोगी श्री सदानंद महाराज यांच्या आश्रमास ६९ गुंठे जागा मिळणार आहे. सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी केलेल्या मागणीवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे.

वसई पूर्वेच्या भागात तुंगारेश्वर देवस्थान परिसर आहे. याच डोंगरावर अनेक वर्षांपासून बालयोगी श्री सदानंद महाराज यांचे आश्रम आहे. या ठिकाणी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक येतात. मागील काही वर्षांपासून आश्रमासंदर्भात विविध अडचणी निर्माण होत आहेत. त्या सोडवण्यासाठी बालयोगी संदानंद महाराज आश्रम ट्रस्ट, तुंगारेश्वर देवस्थानतर्फे शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. अद्याप यातून मार्ग निघाला नसल्याने उत्तर प्रदेशाचे माजी राज्यपाल राम नाईक यांच्या शिष्टमंडळ आणि सामाजिक कार्यकर्ते अनिल गलगली यांच्या मार्फत पुन्हा एकदा पाठपुरावा सुरू केला होता. या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यानंतर या मागणीचा सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.

तसेच वन संरक्षण कायदा १९८० आणि वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अन्वये संरक्षित जमीन देण्यासाठी राज्य सरकारचे 'ना हरकत पत्र' लागते. हे प्रकरण महाराष्ट्र सरकारकडे तीन वर्षे अनिर्णीत असल्यामुळे त्याबद्दलचा सकारात्मक निर्णय लवकर करण्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वनमंत्री, संबंधित प्रकरण हाताळणारे उच्चाधिकारी, तसेच आश्रमाचे तीन प्रतिनिधी, स्वतः राम नाईक आणि या प्रकरणी पाठपुरावा करणारे विशेषज्ञ अनिल गलगली यांची संयुक्त बैठक घेण्याची मागणी राम नाईक यांनी केली. त्याप्रमाणे बैठक बोलावण्याचे आश्वासन मुख्यमंत्री यांनी दिले आहे.

**आश्रमाच्या मागण्या**

सामाजिक कार्यकर्ते अनिल गलगली यांनी चार स्वतंत्र अर्ज केले असून त्यात ६९ गुंठे जमीन आश्रमास देण्यात यावी, भाविकांना आश्रमात जाण्यासाठी असलेला प्रतिबंध हटविण्यात यावा, तुंगारेश्वर अभयारण्यात अस्तित्वात असलेल्या सातिवली ते बॉक्साइट खाणीपर्यंतचा ७.८० किलोमीटर रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी, परशुराम कुंड आणि तुंगारेश्वर महादेव मंदिराला 'क' तीर्थस्थळाचा दर्जा २००५ मध्ये देण्यात आला असून गेल्या १७ वर्षांत सरकारने कोणतीही विकासाची कामे केली नाहीत ती कामे मार्गी लावावीत, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

दि. २६/१०/२२.

(७) लोकसत्ता पृ. ५/१ नं.०१

वृत्त...४

## दिवाळी सणात बेकायदा मद्यविक्री जोरात

**वसई:** ऐन सणासुदीमध्ये वसई-विरार शहरांमध्ये बेकायदा मद्यविक्री सुरू झाली आहे. परराज्यातून चोरट्या मार्गाने मद्य आणून शहरांत वितरित केले जात आहे. तसेच हातभट्टीची दारूसुद्धा विक्रीसाठी आणली जात आहे.

वृत्त...४

५/१ नं.०४

# दिवाळी सणात बेकायदा मद्यविक्री जोरात

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** ऐन सणासुदीमध्ये वसई-विरार शहरांमध्ये बेकायदा मद्यविक्री सुरू झाली आहे. परराज्यातून चोरट्या मार्गाने मद्य आणून शहरांत वितरित केले जात आहे. तसेच हातभट्टीची दारूसुद्धा विक्रीसाठी आणली जात आहे. वसईच्या राज्य उत्पादक शुल्क विभागाने याप्रकरणी कारवाई करून साडेसात लाख रुपयांची हातभट्टीची दारू जप्त केली आहे

दिवाळी सणामध्ये मद्याला मोठी मागणी असते. त्यामुळे परराज्यातून मोठ्या प्रमाणात चोरट्या मार्गाने मद्य आणून तसेच बंदी असलेल्या हातभट्टीच्या दारूची विक्री केली जात असते. राज्य उत्पादक शुल्क विभागाने ठिकठिकाणी सापळे लावून नाकाबंदी केली आहे. सोमवारी दुपारी हातभट्टीची दारू विक्रीसाठी येणार असल्याची माहिती राज्य उत्पादक शुल्क विभागाला मिळाली होती. त्यानुसार नालासोपारा पूर्वेच्या संतोष भवन येथे विभागाने सापळा लावला होता. या कारवाईदरम्यान एका संशयास्पद टेम्पोची तपासणी केल्यानंतर त्यात साडेसात लाख रुपयांची देशी हातभट्टीची दारू लपवून ठेवल्याचे आढळले. याप्रकरणी टेम्पोचालकाला अटक करण्यात आल्याची माहिती, राज्य उत्पादक शुल्क विभागाच्या वसई विभागाचे निरीक्षक दिलीप बामणे यांनी दिली.

दि. २६/१०/२२

## कर्मचाऱ्यांकडून वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल

वसई : अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी पालिकेने तयार केलेल्या बीट चौक्यातील कर्मचाऱ्यांनी पालिका अधिकाऱ्यांपासूनच माहिती दडवून ठेवली आहे. त्यामुळे पालिकेने संबंधित प्रभागातील साहाय्यक आयुक्तांवर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

# वरिष्ठ अधिकाऱ्यांची कर्मचाऱ्यांकडून दिशाभूल

## बीट चौकीत आलेल्या तक्रारी दडवून ठेवल्याचा आरोप

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी पालिकेने तयार केलेल्या बीट चौक्यातील कर्मचाऱ्यांनी पालिका अधिकाऱ्यांपासूनच माहिती दडवून ठेवली आहे. त्यामुळे पालिकेने संबंधित प्रभागातील साहाय्यक आयुक्तांवर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

वसई विरार शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे सुरू आहेत. उच्च न्यायालयानेसुद्धा त्याबद्दल ताशेरे ओढले होते. त्यामुळे पालिकेने अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबरोबर वेगवेगळ्या उपाययोजना अमलात आणल्या होत्या. जेथे अनधिकृत बांधकामे उभी राहतात, त्या परिसरात देखरेख ठेवण्यासाठी या बीट चौक्या तयार करण्यात आल्या आहेत. त्यानुसार पालिकेने ४ बीट चौक्या उभारल्या आहेत. पेल्हार, वालीव येथे बीट चौक्या उभारल्या आहेत. तेथे तैनात असलेल्या कर्मचाऱ्यांनी साहाय्यक आयुक्तांना अहवाल सादर करणे अपेक्षित होते. मात्र बीट चौक्या उभारून महिना झाल्यावर तीन तक्रारी आल्या होत्या. त्यामध्ये अनधिकृत बांधकामे होत असल्याचे नागरिकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले.

संबंधित बीट चौक्यांमधील तक्रारींची नोंद तपासली असता अनेक तक्रारी आल्याचे समजले. मात्र वरिष्ठांकडे त्यातील केवळ तीन तक्रारींची माहिती पुढे पोहोचवण्यात आली होती. त्यामुळे उपायुक्त संतापले आहेत. या सर्व कर्मचाऱ्यांना समज दिली असून अतिक्रमणे न तोडल्यास संबंधित प्रभागातील साहाय्यक आयुक्तांवर कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

> **“ अनधिकृत बांधकामाला आळा बसावा म्हणून आम्ही बीट चौक्या उभारल्या होत्या. मात्र तेथील कर्मचाऱ्यांनी माहिती दडवल्याचे लक्षात आले आहे. आता या सर्वांना समज दिली असून, सर्व तक्रारींवर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.**
>
> **– अजित मुठे,** पालिका उपायुक्त (अतिक्रमण)

दि. २६/१०/२२

(४) लोकसत्ता पृ. भाग नं.०४

## उद्यानात महिलांसाठी विशेष स्वच्छतागृह

**भाईंदर :** मीरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील ओवळा-माजिवाडा मतदारसंघातील पालिका उद्यानांत महिलांसाठी विशेष शौचालयाची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी राज्य शासनाकडून २५ कोटी रुपयांचा निधीसुद्धा मंजूर झाला आहे.

पालिकेच्या सहा उद्यानांत महिलांसाठी विशेष स्वच्छतागृहाची निर्मिती केली जाणार आहे. त्यामध्ये मासिक पाळीदरम्यान काळजी घेण्यासाठी तसेच स्तनपान करण्यासाठी विशेष सोयीसुविधा तसेच दालनांची निर्मिती केली जाणार आहे. हे संपूर्ण स्वच्छतागृह वातानुकूलित असणार आहे.

(५) महाराष्ट्र टाईम्स पृ. भाग नं.०७

## श्वान निर्बिजीकरण मोहीम पुढील महिन्यापासून

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदरमधील बंद असलेल्या श्वान निर्बिजीकरण केंद्राचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे थांबलेली श्वान निर्बिजीकरण मोहीम पुढील महिन्यापासून पुन्हा सुरू होणार आहे.

पालिका प्रशासनाकडून भाईंदरच्या उत्तन परिसरात श्वान निर्बिजीकरण केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्रात केवळ ४० कुत्र्यांवर उपचार करण्याची व्यवस्था होती. मात्र हे केंद्र अपुरे पडत असल्याने त्याचा विस्तार करण्यासाठी मागील सहा महिने श्वान निर्बिजीकरण मोहीम बंद ठेवण्यात आली होती. या कालावधीत भटक्या कुत्र्यांची संख्या प्रचंड वाढली होती. भटक्या कुत्र्यांनी बालकांसह वयोवृद्धांवर हल्ले केल्याच्या घटनाही घडल्या होत्या. त्यामुळे निर्बिजीकरण केंद्र सुरू करावी, अशी मागणी केली जात होती.

राज्य सरकारच्या पशुवैद्यकीय विभागानेही निर्बिजीकरण केंद्र सुरू करत, मोहीम राबवण्याचे आदेश पालिकेला दिले होते. नुकतेच या केंद्राच्या विस्तारीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. डॉक्टर व इतर कर्मचारी पुरवण्याच्या कंत्राटाची प्रक्रियाही राबवण्यात आली आहे. त्यामुळे आता पुढील महिन्यापासून हे केंद्र सुरू केले जाणार आहे. या केंद्रात आता १०० कुत्र्यांवर उपचार करण्याची सुविधा निर्माण करण्यात आली असून, यामुळे श्वान निर्बिजीकरणाला गती मिळणार असल्याची माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

(६) पुढारी भाग नं.०२

## नवघर पोलिसांकडून नागरिकांना दिवाळीभेट

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

नवघर परिसरात चोरीला गेलेला लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करून पोलिसांनी अनेक गुन्ह्यांची उकल केली. या गुन्ह्यांच्या तपासादरम्यान पोलिसांनी जप्त केलेला मुद्देमाल दिवाळीचे औचित्य साधून संबंधित नागरिकांना परत केला. ऐन दिवाळीत चोरीला गेलेला मुद्देमाल, परत मिळाल्याचे समाधान नागरिकांच्या चेहऱ्यांवर स्पष्ट दिसत होते.

मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयामधील नवघर पोलिसांनी विविध गुन्ह्यात जप्त केलेला २ लाख १७८ हजार रुपयांचा मुद्देमाल दिवाळी सणानिमित्त पिडीतांना परत दिला आहे. नवघर पोलीस ठाणे हद्दीत विविध चोरी झाल्याच्या घटना घडल्या होत्या. त्यातील पोलिसांनी काही गुन्हे उघडकीस आणून आरोपीकडून २ लाख १८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला होता. जप्त केलेला मुद्देमाल पीडितांना शशिकांत भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांचे हस्ते दिवाळी निमित्त परत करण्यात आला. या मुद्देमालामध्ये १ ऑटो रिक्षा, ७ माबाईल फोन, सोन्याचे दागिने व रोख रक्कम या वस्तुंचा समावेश होता.

दि. २८।१०।२२

(७७) महाराष्ट्र टाईम्स ५-पान नं.०१

## फटाक्यांमुळे २३ ठिकाणी आगी

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदरमध्ये सोमवारी, लक्ष्मीपूजनाच्या दिवशी तब्बल २३ ठिकाणी फटाक्यांमुळे आग लागल्याच्या घटना घडल्या. यापैकी चार ठिकाणी मोठी आग लागल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. विविध भागांमधील आगी विझवण्याचे काम सोमवारी रात्री उशिरापर्यंत अग्निशमन दलाकडून सुरू होते. या घटनांमध्ये



**मिरा-भाईंदरमध्ये पहिल्या दिवसातील घटना**

कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती अग्निशमन दलाने मंगळवारी दिली.

मिरा-भाईंदर शहरात लक्ष्मीपूजनाच्या मुहूर्तावर फटाक्यांची मोठ्या प्रमाणावर आतषबाजी सुरू होती. यामुळे भाईंदर पूर्व व मिरा रोड परिसरात चार ठिकाणी मोठ्या आगी लागल्या. भाईंदरच्या गोल्डन नेस्ट परिसरात एका घराला लागलेला आगीत सुमारे तीन लाख रुपयांचे नुकसान झाले. तर मिरा रोडच्या नया नगर येथील एका इमारतीमधील घराला लागलेल्या आगीत सुमारे १० ते १२ लाखांचे नुकसान झाले, तर दोन लाख रुपयांची रोकड जळाली. आरएनपी पार्क व घोडदेव नाका परिसरात आगीच्या घटना घडल्या. विविध भागांत १९ ठिकाणी किरकोळ आगी लागल्या.

खबरदारीचा उपाय म्हणून शहरातील फटाक्यांच्या दुकानांबाहेर काही अग्निशमन वाहने व कर्मचारी आधीपासूनच तैनात करण्यात आले होते. त्यांच्या मदतीने घटनास्थळी तात्काळ पोहोचणे अग्निशमन दलाला शक्य झाले. काही इमारतींमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा बंदच असल्याचे या आगींच्या निमित्ताने समोर आले.

(७८) पुढारी पान नं.०५.

## ठरवून दिलेल्या वेळेतच फटाके वाजवा!

**वेळमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यावर गुन्हे दाखल करणार**

मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा

मीरा भाईंदर, वसई विरार आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये दिवाळी सणामध्ये फटाके वाजवण्यासाठी पोलिसांनी वेळ मर्यादा ठरवून दिली आहे. या वेळमर्यादेत फटाके वाजवावे अन्यथा वेळमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यावर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

मिरा भाईंदर, वसईविरारपोलीस आयुक्तालय हद्दीत दिवाळीच्या दिवशी फटाके हे रात्री ८ ते १० वाजेपर्यंत वाजवण्यास परवानगी देण्यात आलेली असून ख्रिसमस व नूतन वर्षाच्या स्वागतासाठी मध्यरात्री ११.५५ ते १२.३० वाजेपर्यंत फटाके वाजवण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. कमी उत्सर्जन असलेलेफटाकेवकेवळहिरवेफटाके यांची निर्मिती व विक्री करण्यात यावी असे सांगण्यात आले आहे. मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण आणि घनकचऱ्याच्या समस्या निर्माण करणाऱ्या फटाक्यांच्या निर्मिती व विक्रीवर बंदी घालण्यात आलेली आहे. त्याचबरोबर फटाक्यांमध्ये बेरियम क्षारांचा वापर करण्यास बंदी आहे. फटाक्यांच्या वापरामुळे होणारे हानिकारक परिणाम याची माहिती सर्वसामान्य जनतेस देण्यासाठी जनजागृती मोहीम राबविण्यात देखील येत आहे. फटाक्यांची निर्मिती, वाहतूक, विक्री व वापराबाबत सर्वोच्च न्यायालयाची बंदी असून काही मार्गदर्शक सूचना देखील देण्यात आल्या आहेत. फटाके वाजविण्यासाठी वेळ देखील निश्चित करण्यात आलेली आहे.

सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक यांनी आपापल्या हद्दीमध्ये फटाके विक्री करणाऱ्या स्टॉल धारकांकडून न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांची फटाके विक्रेते पूर्तता करत आहेत किंवा नाही याची व्यक्तिशः दखल घेऊन कार्यवाही करावी व फटाके निश्चित दिलेल्या वेळेतच वाजवले जातील याची खबरदारी घ्यावी असे पोलीस उपआयुक्त विजयकांत सागर यांनी सांगितले आहे. शहरात रात्री उशीरा पर्यंत मोठ्या प्रमाणत वायू प्रदूषण व ध्वनी प्रदूषण करणारे फटाके वाजवण्यात येत आहेत.

दि. २६।१०।२२.

(२२) पुढारी पान नं.०५

# रेल्वे पादचारी पूल बनला बेघरांचा निवारा

## भाईंदरमध्ये पुलावरील पायपीट ठरू लागलीय भीतीदायक

**भाईंदर : राजू काळे**

पश्चिम रेल्वे प्रशासनाने गैर रेल्वे प्रवाशांना भाईंदर पूर्व, पश्चिमेला ये-जा करण्यासाठी दक्षिण बाजूस पाच वर्षांपूर्वी पादचारी पूल बांधला. हा पूल गैर रेल्वे प्रवाशांना फायदेशीर ठरत असला तरी या पुलावर गर्दुल्ले, भिकारी, मद्यपचा वावर वाढल्याने त्यांची या पुलावरील पायपीट भितीदायक ठरू लागली आहे. येथून रात्रीच्यावेळी पादचाऱ्यांना ये-जा करताना जीव मुठीत धरून चालावे लागते.

या पादचारी पुलाच्या पूर्वी रेल्वे प्रशासनाने भाईंदर पश्चिमेच्या ६० फूट मार्गावरील रेल्वे समांतर रस्त्यावरून पूर्वेकडील केबिन रोडवर जाण्यास पादचारी पूल बांधला होता. मात्र हा पादचारी पूल रेल्वे स्थानक परिसरात राहणाऱ्यांसाठी दूर अंतरावर असल्याने भाईंदर स्थानकाजवळ राहणाऱ्या लोकांसाठी तो गैरसोयीचा ठरला. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने स्थानिक लोकांच्या मागणीनुसार भाईंदर रेल्वे स्थानकाजवळ दक्षिण दिशेला नवीन पादचारी पूल बांधला. यामुळे रेल्वे स्थानक परिसरातील लोकांची सोय झाली. या पुलावर पादचाऱ्यांची वर्दळ कमी असल्याचा त्याचा गैरफायदा घेत पुलावर गर्दुल्ले, भिकारी व मद्यपींनी त्यावर आपले मांडण्यास सुरुवात केली आहे. त्यातच रात्रीच्या वेळी या पुलावरील लोकांची वर्दळ अत्यल्प रहात असल्याने येथून ये-जा करणाऱ्या पादचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन चालावे लागते. कारण रात्रीच्या वेळी पुलावर गर्दुल्ल्यांचा वावर वाढत असल्याने पादचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. अशातच महिला व तरुणींना रात्रीच्या वेळी या पुलावरून ये-जा करण्यास अनियमित बंदीच घातली जात असल्यासारखे वाटते. त्यामुळे रात्रीच्या वेळी हा पूल महिला व तरुणींसाठी भीतीदायक ठरू लागला आहे. त्यातच रात्रीच्या वेळी पुलाच्या पूर्वेकडील बाजूस वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांचा वावर वाढत असल्याने पादचारी महिला व तरुणींकडे बघण्याचा दृष्टीकोन वाईट ठरू लागला आहे.

### सामान्य पादचारी जीव मुठीत धरून जा-ये करतात



यामुळे रात्रीच्या वेळी पुलावरून ये-जा करताना त्यांची मोठी कुचंबणा होते. तसेच अनेकदा गर्दुल्ले, भिकारी व मद्यपी पुलावरच झोपत असल्याने हा पूल बेघरांचा निवारा आहे कि काय असे वाटू लागले आहे. हा पूल रेल्वे प्रशासनाने अथवा स्थानिक पोलिसांनी गर्दुल्ले, भिकारी व मद्यपीमुक्त करून सामान्य पादचाऱ्यांसाठी भितीमुक्त करावा तसेच या पुलावर सतत गस्त घालण्यात यावी, अशी मागणी होऊ लागली आहे.

(२३) पुढारी पु. पान नं.०४

# वसईचे गावपाडे चोरट्यांचे लक्ष्य

**वसई :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या वसई शहरानजिकच्या गावपाड्यांमध्ये आता चोरट्यांनी आपला मोर्चा वळवला आहे. वसई-विरार तसेच नालासोपारा शहरात घरफोड्यांबरोबरच चोरीच्या घटनांत वाढ झालेली असतानाच आता वसई तालुक्यातील खानिवडेसारख्या गावपाड्यातही घरफोडीची घटना घडलेली आहे. त्यामुळे पोलिसांसमोर चोरट्यांना पकडण्याचे आव्हान उभे ठाकले आहे. नुकतेच खानिवडे गावातील रहिवासी संजय कुडू यांच्या घरात चोरी झाली होती. चोरट्यांनी एका घरातले कपाट तोडून त्यातील लाखो रुपये दागिने लांबवले. पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी घरात घुसून ग्रील नसलेल्या खिडकीतून घरात प्रवेश केला. घरातील मंडळी झोपेत असताना कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा ऐवज घेऊन चोरटे पसार झाले. काही महिन्यापूर्वी येथील राम मंदिरात दोनदा चोरी झाली होती. त्यामुळे चोरीच्या या घटनांनी खानिवडेवासीय चिंतेत आहेत. एकूणच चोरट्यांनी गावपाड्यांना लक्ष्य केल्याने पोलिसांसमोर चोरट्यांना पकडण्याचे आव्हान उभे ठाकले आहे.

दि. २६/१०/२२.

(३३) सकाळ पान नं.०३

## घरफोडी करणारे सराईत अटकेत

नालासोपारा, ता. २५ (बातमीदार) : घरफोडी करणाऱ्या चार सराईत आरोपींना अटक करण्यात वालीव गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश आले आहे. या आरोपींकडून ४ लाख ६३ हजार १०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असून एकट्या वालीव पोलिस ठाणे हद्दीतील १२ आणि निर्मलनगर पोलिस ठाण्यातील एक अशा १३ गुन्ह्यांची कबुली या चोरट्यांनी दिली असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक कैलास बर्वे यांनी दिली.

शमीम ऊर्फ राजा रमजान अन्सारी, बालकराम ऊर्फ मुन्ना रामकिशन विश्वकर्मा, वलीउल्ला शफीउल्ला चौधरी, चँद ऊर्फ हमीद शफीक अहमद रईम अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून हे सर्व जण वसई परिसरातील राहणारे आहेत.

(३४) सामना पान नं.०८

## ऑनलाईन गंडा

नालासोपारा : लोन देतो असे सांगून एका महिलेला सायबर भामट्याने ५ लाखांना चुना लावल्याची घटना घडली आहे. तीन आरोपींनी लोन देतो असे सांगून महिलेला लोन ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यानंतर तिच्या खात्यातून टप्प्याटप्प्याने ४ लाख ८१ हजार रुपये काढून घेतले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महिलेने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

(३५)

## मुलीचे अपहरण

विरार : एका चार वर्षीय चिमुकलीचे अपहरण करण्यात आल्याची घटना शहरात घडली आहे. संतोष भुवन परिसरात राहणारी चिमुकली घराबाहेर खेळत होती. त्यानंतर ती घरी परत आलीच नाही. तिच्या कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला. मात्र ती कुठेच सापडली नाही. चिमुकलीच्या आईवडिलांनी केलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

(३६) सामना पान नं.०८.

## मुद्देमाल परत

भाईंदर : नवघर पोलीस ठाण्यांतर्गत नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. तब्बल अडीच लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी दिवाळीचे औचित्य साधून मूळ मालकांच्या ताब्यात दिला. त्यात १ रिक्षा, ७ मोबाईल, सोन्याचे दागिने, रोख रक्कम आदींचा समावेश आहे. आपला चोरीला गेलेला मुद्देमाल परत मिळाल्याचा आनंद नागरिकांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

दि. २६/१०/२२

(७) पुण्यनगरी पुरवणी पान नं. ०७

# धर्मवीर संभाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारणार

## पालिका आयुक्तांची मान्यता

**। मीरा रोड ।** मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे नवघर आरक्षण क्र. २९९ मध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा व स्मारक उभारण्यास आयुक्त दिलीप ढोले यांनी प्रशासकीय ठरावाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे लवकरच मीरा रोड येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा व स्मारक उभारण्यात येणार आहे.

शहरात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा व स्मारक बांधण्यासाठी काही वर्षांपासून जंजिरे धारावी जतन समिती व युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र या सामाजिक संघटनांकडून मागणी केली जात आहे. या मागणीनुसार पुतळा व स्मारक बांधण्यासाठी जागा निश्चित करून शासनाकडील पुतळा धोरण व मार्गदर्शक तत्त्वानुसार आवश्यक शासकीय परवानगी घेऊन प्रस्ताव अंतिम परवानगीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात येणार आहे. महापालिकेने मीरा रोडमधील मौजे नवघर येथे आरक्षण क्र. २९९ (उद्यान) या ठिकाणी जागा निश्चित करून ही जागा बंदिस्त करून या जागेत अश्वारूढ पुतळा बसविण्यासाठी शासनाच्या धोरणानुसार आवश्यक कार्यवाही व पत्रव्यवहार करून मान्यता घेण्यात येणार आहे. हा पुतळा व स्मारक बनवण्यासाठी येणाऱ्या खर्चास आयुक्तांनी मान्यता दिली आहे.

दरम्यान, महापालिका प्रशासनाने मान्यता दिल्याने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास नागरिकांना व नवीन पिढीला समजेल. आता महापालिकेने शासनाकडे लवकर पाठपुरावा करून लवकरात लवकर हे काम पूर्ण करावे, अशी प्रतिक्रिया जंजिरे धारावी जतन समिती व युवा प्रतिष्ठान महाराष्ट्रने दिली आहे.